# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 15/02/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

### गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. जलालखेडा :— अंतर्गत 06 कि.मी अंतरावर दातेवाडी येथे दिनांक 11/02/2021 चे 20.00 वा ते 20.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे— पुरूषोतम सखाराम तायडे, वय 42 वर्ष रा. दातेवाडी. त. नरखेड हा कामावरून घरी आला व जेवन करून खर्रा आणण्याकरीता पानठेल्यावर गेला होता. तो खर्रा घेवुन परत येत असतांनी आरोपी नामे— 1) श्रावण दौलत ढोणे, वय 43 वर्ष, 2) निलेश श्रावन ढोणे वय 19 वर्ष, 3) जर्नादन दौलत ढोणे वय 45 वर्ष, 4) धिरज ज्ञानेश्वर इंगळे, वय 29 वर्ष, सर्व रा. दातेवाडी ता.नरखेड जि.नागपूर व 17 वर्षीय विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी गैरकायदयाची मंडळी गोळा करून अज्ञात कारणावरून फिर्यादी यांचे पोठावर,पाठीवर,डोक्यावर व डाव्या हातावर काठी व लोखंडी रॉडने मारून गंभीर जखमी करून जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 143, 147, 148, 149, 323, 307 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. मंगेश काळे 8380807452 हे करीत आहे.

### जबरी चोरी

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत 1 कि.मी अंतरावर स्वर्ग ले आउट काटोल येथे दिनांक 14/02/2021 चे 18.30 वा. ते 18.35 वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ सुरेखा सुरेशराव अडसरे वय 58 वर्ष, रा स्वर्ग ले आउट काटोल या पायदळ फिरून घराकडे जात असता अनोळखी आरोपी हा फिर्यादी समोर मोटार सायकल घेवुन आला व त्याने फिर्यादीचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र 15 ग्रॅम किमंती 45,000/—रू. ची जबरीने झटका मारून हिसकावुन घेवुन चोरून पळून गेला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 392 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक आकाश शाही 9881281071 हे करीत आहे.

### घरफोडी

पो.स्टे. बोरी :— अंतर्गत 02 कि.मी अंतरावर काचोरे ले आउट बुटीबोरी येथे दिनांक 08/02/2021 ते दिनांक 14/02/2021 चे 11.30 वा. ते 13.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे— वसंता ओमकार आदवारे, वय 36 वर्ष, रा.काचोरे ले आउट, साई मंगल कार्यालयाचे मागे बुटटीबोरी, ह.मु अजनी नागपूर यांचे आईवडिल नागपूर येथे फिर्यादीकडे मुक्कामी गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दाराला लावलेला कुलुप वाकवून दरवाजा उघडला आणि घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने बेडरूम मधील लोखंडी कपाटाचे लॉकरमध्ये ठेवलेले जुने वापरते सोन्याचे दागिने कि. 26,000/—रू. व नगदी 10,000/—रू असा एकुण किमती 36,000/रू चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक मोरखेडे मो नं 8208751249हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर